www.rajdand.com
सातारा, शुक्रवार
03.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ शु.११
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे



महाराष्ट्राची नाईशा
६५ मिनिटात उपांत्य फेरीत
पान ४ वर..

# सत्यजित तांबेंची विजयाकडे कूच; कार्यकर्त्यांचा जल्लोष



**नाशिक : वृत्तसंस्था**

**गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू झालेल्या नाशिक पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीचा निकाल स्पष्ट होण्यासाठी आता अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. मतमोजणीच्या चार फेऱ्यांमध्येच सत्यजीत तांबे यांनी मविआच्या शुभांगी पाटील यांच्यासह अन्य प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत भरभक्कम आघाडी घेतली आहे. हे चित्र पाहता सत्यजीत तांबे यांच्या विजयाची आता केवळ औपाचारिकताच शिल्लक राहिलेला आहे. चौथ्या फेरीअखेर सत्यजित तांबे हे ४५,६६० मते घेऊन आघाडीवर होते. शुभांगी पाटील यांच्याके २४,९२७ मते होती. मात्र, हा विजय दृष्टीपथात असताना सत्यजीत तांबे यांनी एक ट्विट करुन महत्त्वाची घोषणा केली. नाशिक ग्रामीणचे युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष मानस पगार यांचे बुधवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातामध्ये निधन झाले होते. मानस पगार हे सत्यजीत तांबे यांचे मित्र आणि समर्थक म्हणून ओळखले जात होते. आपल्या मित्राच्या जाण्याने दु:खी झालेल्या सत्यजीत तांबे यांनी विजयोत्सव साजरा करणार नसल्याचे जाहीर केले आहे.**

सत्यजीत तांबे यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, विजयाच्या आपण अगदी जवळ आहोत,पण विजयोत्सव साजरा करणार नाही. माझा मित्र मानस पगार आज आपल्यातून गेलाय, त्यामुळे कोणताही आनंदोत्सव नाही. सर्व सहकाऱ्यांना विनंती आहे, कृपया संयम राखावा. मी ३ ते ७ फेब्रुवारीला संगमनेर येथे सर्वांना भेटणार आहे. त्यामुळे कोणतीही घाई करु नये, ही विनंती, असे सत्यजीत तांबे यांनी म्हटले आहे. मानस पगार यांच्या अपघाती निधनाची वार्ता कळताच राज्यभरातील काँग्रेस पक्षात आणि राजकीय वर्तुळात शोकाकुल वातावरण होते. सत्यजीत तांबे यांनीही सकाळीच ट्विट करुन खंबीर पाठीराखा गमावल्याची खंत बोलून दाखवली होती. आज नाशिकचा निकाल जाहीर होणार असूनही आज दिवसभर सत्यजीत तांबे बाहेर दिसून आले नव्हते. अगदी रात्र होत आली तरी सत्यजीत तांबे कुठे आहेत, असा प्रश्न अनेकांना पडला होता. त्यानंतर आता सत्यजीत तांबे यांनी ट्विट करुन विजयोत्सव साजरा करणार नसल्याचे जाहीर केले आहे.

**कोण होते मानस पगार?**

मानस पगार हे नाशिक ग्रामीणचे युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष होते. मानस पगार यांनी भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या घराबाहेर दीर्घकाळ केलेल्या आंदोलनाची राज्यभर चर्चा झाली होती. काँग्रेसने २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीवेळी राबवलेल्या सुपर सिक्स्टी अभियानाच्या धर्तीवर महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या माध्यमातून २०२० मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी युवा जोडो अभियान (सुपर १०००) अभियान राबवण्यात आले. या अभियानासाठी मानस पगार यांच्याकडे मुख्य समन्वयकपदाची जबाबदारी देण्यात आली होती.

सत्यजीत तांबे यांचा राजकीय वारसा मोठा आहे. नगरमधल्या संगमनेरमध्ये त्यांचं प्रस्थ आहे. वडील डॉ. सुधीर तांबे आणि आी दुर्गाबाई तांबे यांच्या पोटी १९८३ साली त्यांचा जन्म झालाय. स्वातंत्र्यसैनिक असलेले भाऊसाहेब थोरात हे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक होते. अजोबा स्वातंत्र्यसैनिक, मामा काँग्रेसचे दिग्गज नेते आणि वडील विधान परिषदेचे आमदार असा सत्यजीत यांचा राजकीय वारसा आहे.

पुणे विद्यापीठातून पदवीचं शिक्षण घेतल्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी सत्यजीत अमेरिकेत गेले. हॉर्वर्ड केनेडी विद्यापीठात त्यांनी राज्शास्त्र आणि मॅनेजमेंटमध्ये शिक्ष घेऊन ते मायदेशी परतले. त्यानंतर त्यांचा राजकीय प्रवास सुरु झाला.

वारशानं संधी मिळते, कर्तुत्व सिद्ध करावं लागतं, असं वक्तव्य सत्यजीत तांबेंनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर म्हटलं होतं. वयाच्या ४०शीतही काँग्रेसकडून संधी मिळत नसल्यानं नाराज असलेल्या सत्यजीत यांनी हे धाडसी पाऊल उचलल्याचं सांगण्यात येतंय. अर्थात याला त्यांच्या वडिलांचा आणि मामांचा छुपा पाठिंबा असल्याची चर्चा आहेच. राज्याच्या बदलत्या राजकारणात लाटेवर स्वार होण्याची संधी त्यांनी घेतल्याचं मानण्यात येतंय.

### सत्यजीत ताांबेंचा राजकीय प्रवास

- २००० - काँग्रेस आणि एनएसयूआयचे सदस्य
- २००० ते २००७- सरचिटणीस, एनएसयूआय, महाराष्ट्र
- २००७ ते २०१७- जिल्हा परिषद सदस्य, एनएसयूआयचे सरचिटणीस
- २०११- एनेसयूआयचे उपाध्यक्ष
- २०१८- एनएसयूआयचे अध्यक्ष
- २०२३- विधान परिषदेसाठी अपक्ष उमेदवारी

## नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघात भाजप पुरस्कृत उमेदवाराचा पराभव

### फडणवीस, बावनकुळे यांना धक्का

**नागपूर : वृत्तसंस्था**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना गृह जिल्ह्यात धक्का बसला आहे. नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघात भाजप पुरस्कृत उमेदवाराचा पराभव झाला आहे. महाविकास आघाडी पुरस्कृत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे उमेदवार सुधाकर अडबाले यांचा विजय झाला आहे. भाजप पुरस्कृत नागो गाणार यांचा पराभव झाला आहे.

## कोकण शिक्षक मतदारसंघात भाजपचे ज्ञानेश्वर म्हात्रे विजयी

**रत्नागिरी : वृत्तसंस्था**

कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचा विजय झाला. त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार बळीराम पाटील यांचा पराभव केला. ज्ञानेश्वर म्हात्रे यांना पहिल्या फेरीत तब्बल २० हजार ६४८ मते मिळाली. तर बाळाराम पाटील यांना ९७६८ मते मिळाली आहेत. एकूण ३००२ मते अवैध ठरली आहेत. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी विजयी मताचा १६ हजार मतांचा कोटा पूर्ण केल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात आले.



इनकम नाही इनकम टॅक्स नाही, आपल्यासाठी बजेट खतम!

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघांचा मृत्यू; चालकावर गुन्हा

**नारायणगाव : प्रतिनिधी**

कांदळी (ता.जुन्नर) गावच्या हद्दीत मोटर सायकलला अज्ञात वाहनाची धडक बसून दोघांचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.१) रात्री ७.३० वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

याबाबत येथील गुळाचे गुऱ्हाळ चालक सुहास जगन्नाथ घाडगे (रा.कांदळी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कांदळी गावच्या हद्दीतील कांदळी फाट्याकडून जुल्फीकार दिलशाद मालिक (वय २२) राहणार चुडीवाला मोहनपुर, ता.रुडकी.जि. हरिद्वार उत्तराखंड व इस्तकार मालिका राहणार. खातखेडा. ता.रुडकी.जि.हरिद्वार उत्तराखंड हे दोघे बजाज कंपनीची मोटरसायकल क्रमांक एम एच १२ बी झेड ६८६ वरून कांदळी फाट्याकडून सर्विस रोडने १४ नंबर बाजूकडे जात होते. अज्ञात वाहन चालक पाठीमागून भरधाव वेगाने येऊन रस्त्यांच्या नियमांकडे दुर्लक्ष करीत मोटर सायकलला धडक देऊन निघून गेला. झालेल्या अपघातात मोटर सायकलवरील दोघे मृत्युमुखी पडले. पुढील तपास नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पृथ्वीराज ताटे करीत आहे.

## नोकरीच्या आमिषाने तब्बल ४ लाख ९९ हजारांची फसवणूक

### सांगलीच्या एकावर पुसेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**सातारा : प्रतिनिधी**

मंत्रालयात नोकरीस लावतो, असे सांगून सांगली जिल्ह्यातील एकाने भाडळे तालुका कोरेगाव येथील चालक रामदास बाळू आवारे याची ४ लाख ९९ हजार रुपयाची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी प्रकाश उर्फ सुनील आनंदा बनसोडे राहणार हे ऐतवडे तालुका वाळवा जिल्हा सांगली यांच्यावर पुसेगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुसेगाव पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या फिर्यादीनुसार आरोपी आणि फिर्यादी यांची ओळख काही कामानिमित्ताने झाली होती त्यावेळी बनसोडे यांनी रामदास आवारे याला मंत्रालयात नोकरी लावतो असे सांगून त्याच्याकडून दिनांक ६ ऑक्टोबर २०२० रोजी ४९ हजार रुपये, दिनांक सात ऑक्टोबर २०२० रोजी दीड लाख रुपये ,दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी तीन लाख रुपये असे एकूण चार लाख ९९ हजार रुपये घेतले ही रक्कम वक्रतुंड मोटर्स आयडीबीआय बँक कोरेगाव येथे भरावयास सांगण्यात आली होती.

एवढे पैसे भरूनही मंत्रालयात नोकरी न लागल्याने फसवणूक झाल्याचे आवारे यांच्या लक्षात आले त्यानुसार त्यांनी पुसेगाव पोलीस ठाण्यामध्ये फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

पोलीस हवालदार सि आर खाडे अधिक तपास करत आहेत.

## विद्यापीठ, कॉलेज कर्मचाऱ्यांचा परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार

### सोलापूर, कोल्हापूरसह मुंबई विद्यापीठाच्या आजपासून होणाऱ्या सर्व परीक्षा स्थगित

**सोलापूर : प्रतिनिधी**

राज्यभरातील विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे राज्यातील विद्यापीठातील परीक्षा पद्धतीवर मोठा परिणाम होतोय. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठासह मुंबई विद्यापीठाच्याही आजपासून होणाऱ्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत.

महाविद्यालयीन शिक्षेकतर कर्मचाऱ्यांनी परीक्षा कामकाजवर बहिष्कार आंदोलन सुरू केल्याने पुढील आदेशापर्यंत परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपूर यांनी ही माहिती दिली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात इअ, इडउ, इइअ, ङअथ काही विभागाच्या सुरु आहेत. काही विभागाच्या परीक्षा सुरू होणार आहेत मात्र शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परीक्षा कामकाजवर बहिष्कार आंदोलन सुरु केल्याने परीक्षावर परिणाम झाला आहे. २०१६ पासून शिक्षकेत्तर कर्मचारी आपल्या विविध मागण्यांसाठी वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन करत आहेत. मात्र शासनाकडून केवळ आश्वासनाशिवाय काहीही मिळत नाही. प्रत्येक वेळेस विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही आंदोलन मागे घेतो.

राज्यातील २८८ पैकी जवळपास २०० आमदारांना यासंदर्भात पत्र दिले आहे. सर्व खासदाराने देखील या संदर्भात कळवलेले आहे. उच्च शिक्षण मंत्र्यांकडे देखील निवेदनाद्वारे मागणी केली होती. मात्र या मागण्यांची दखल न घेतल्याने आजपासून परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. २० फेब्रुवारीपासून परीक्षेसह सर्वच पद्धतीच्या कामकाज बंद करण्याचा इशारा महाविद्यालयीन आणि विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दिला.



दरम्यान, २३ जानेवारीपासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षांना सुरुवात झाली आहे. तर काही विभागाच्या परीक्षा सुरू होणार आहेत. अशातच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकल्याने परीक्षा स्थगित करण्याची नामुष्की ओढावली आहे.

**शिवाजी विद्यापीठातील आजच्या सर्व परीक्षा स्थगित**

शिवाजी विद्यापीठातील आजच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहे. शिक्षकेत्तर कर्मचारी आंदोलनाचा परिणाम झाला आहे. विविध मागण्यांसाठी आजपासून कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन करण्यात आले आहे. परीक्षेची पुढील तारीख आणि माहिती संकेस्थळावर कळवली जाईल असे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे

**शिक्षेकतर कर्मचारी यांच्या या आहेत मागण्या**

सेवाअंतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा रद्द केलेले शासन निर्णय पुनर्जिवित करुन पूर्ववत लागू करा, सातव्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार १०.२०.३० वर्षानंतरच्या लाभाची योजना विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करा.

सातव्या वेतन आयोगापासून वंचित असलेल्या १४१० विद्यापीठीय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करुन विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०१६ ते प्रत्यक्ष सातवा वेतन लागू झाला त्या कालवधीतील वेतनाच्या फरकाची थकबाकी अदा करा.

विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता द्या.

२००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करा

विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी गृहित धरून त्या आधारे सातवा वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करा.

## पुण्यातील सर्वच गुन्हेगार ‘वीरप्पन’!; आरोपींना पकडण्यासाठी बक्षीस योजना

### आरोपींना पकडण्यासाठी बक्षिस योजना अन् आरोपीचे पोलिसांच्या तावडीतूनच पलायन

**पुणे : युवराज बनसोडे**

पुणे पोलिसांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित व्हावे असे वातावरण सध्या शहरात पाहिला मिळत असून, मोक्का आणि एमपीडीए व पाहिजे-फरारी आरोपींना पकडणाऱ्या पोलिसांना चक्क बक्षीस देण्याची योजनाच सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे पुण्यातील सर्वच गुन्हेगार ‘‘वीरप्पन‘‘ आहेत का, असा ‘‘सवाल‘‘ उपस्थित केला जात असून, पुणे पोलिसांच्या बक्षिस योजनेवर पुणेकर अन् विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी टीका केली आहे. तर, पोलीस दलात देखील उलट-सुलट चर्चा सुरू आहे. एकीकडे आरोपींना पकडण्यासाठी बक्षिस योजनेसारखे ‘‘केवील-वाने‘‘ प्रयत्न सुरू असताना ‘‘मोक्का‘‘तील गुन्हेगारानेच पोलिसांच्या तावडीतून पलायन केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे.



पुण्यातील कोयतेधारी टोळक्याने पुणे दहशतमय केले आहे. वाढत्या गुन्ह्यांनी पुणेकर हैराण अन् पोलीस परेशान झाले आहेत. मिसरूडे फुटलेल्या नवीन गुन्हेगारांनी पोलिसांच्या नाकेनऊ आणत पुणेकरांना दहशतीखाली ठेवले आहे. कोयतेधाऱ्यांना आळा घालण्यास पोलीस अथक प्रयत्न करत आहेत. आता कोयते विक्रेत्यांना कोयते विकताना ग्राहकांची माहिती ठेवावी लागणार आहे. त्यांचे आधार कार्ड व नाव, मोबाईल क्रमांक द्यावा लागणार आहे. त्यातून अल्पवयीन मुले तसेच गुन्हेगारीसाठी कोयते घेऊन जाणाऱ्यांना जरब बसणार आहे. तसेच, पोलिसांकडून अवैधरित्या कोयते विक्रेत्यावर कारवाई केली जात आहे.

**कारवाई व बक्षिस...**

- **पिस्टल पकडणे- १0 हजार**
- **कोयता, तलवारी व शस्त्र- ३ हजार**
- **फरारी आरोपी पकडणे- १0 हजार**
- **पाहिजे आरोपी पकडणे- ५ हजार**
- **मोक्कातील आरोपीला पकडणे- ५**
- **एमपीडीएतील आरोपी पकडणे- ५**
- **तडीपार पकडणाऱ्यांस - २ हजार**

पुणे पोलिसांना पाहिजे आणि फरार असे तब्बल २ हजार ६०० गुन्हेगार हवे आहेत. त्यांचा शोध घेतला जात आहे. तर मोक्का व एमपीडीएनुसार कारवाई केल्यानंतर पसार असणाऱ्यांना देखील शोधले जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पाहिजे आरोपींचा हा आकडा तितकाच आहे. तो कमी होत नसल्याचे वास्तव आहे. त्यात भरच पडत आहे. शोध घेऊनही आरोपी सापडत नाहीत. तर, अनेक महिने त्यांचा पाठलाग व पाठपुरावा करावा लागतो. अशावेळी न मिळणाऱ्या आरोपींवरील लक्ष काढून टाकले जाते. गांर्भियाने त्याकडे पोलीसही लक्ष देत नाहीत.

प्रोत्साहन देण्यासाठी बक्षिस योजना सुरू करण्यात आली असून, आरोपींना पकडणाऱ्या पोलिसांना बक्षिस दिले जाणार आहे. परंतु, या बक्षिस योजनेवरून आता पुणे पोलीस टीकेचे धनी अन् चेष्टेचा विषय ठरत आहेत. कारण, आरोपींना पकडण्यासाठी देखील पोलिसांना बक्षिस का.? मग त्यांच कामच काय, असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

आरोपींना पकडण्याबाबतच्या बक्षिस योजनेची चर्चा सुरू असतानाच मोक्कातील एक आरोपी पोलिसांच्या तावडीतून पसार झाल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. मार्केटयार्डन पोलिसांच्या तपास पथकाला धक्काबुक्कीकरून तो पळाला असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे पोलिसांना आहे त्या आरोपींना सांभाळता येईना अन् फरार आरोपींना पकडण्यासाठी बक्षिस योजना कशाला असेही म्हटले जाऊ लागले आहे.

> “
> **एखादा गुंड अजिबातच सापडत नसेल तर त्याला पकडण्यासाठी बक्षीस जाहीर केले जाते. वीरप्पन, चार्ल्स शोभराज सापडत नव्हते तेव्हा अशा प्रकारचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. मात्र सरसकट बक्षीस जाहीर केले जात असेल तर पोलीस यंत्रणेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण होतात. पोलिसांनी नवीन पायंडे पाडू नये.**
>
> **- अजित पवार,**
> **विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र राज्य**

## युवतीच्या विनयभंग प्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**सातारा** : सातारा तालुका परिसरातील युवतीचा विनयभंग करून तिला धमकी दिल्या प्रकरणी सातारा तालुका पोलीस ठाण्यामध्ये एकावर गुन्हा दाखल झाला आहे अनिल सिंह अजित सिंह चितोडिया राहणार जळगाव असे संबंधिताचे नाव आहे.

सन २०१८ ते ३१ जानेवारी २०२३ या दरम्यान वेळोवेळी अनिल सिंह याने संबंधित युवतीची एक चित्रफित तयार केली होती तो युवतीला वारंवार भेटण्यासाठी जबरदस्ती करत होता भेटण्यास जर गेले नाही तर ती चित्रफीत समाज माध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी त्याने दिली होती . संबंधित युवतीने या धमकीला कंटाळून सातारा तालुका पोलीस ठाण्यात सायंकाळी फिर्याद दिली.